**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१३**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-१८/२/२०११

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.१३ बुधवार दि.२३/०२/२०११ रोजी सकाळी ११.००वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**बुधवार दिनांक- २३/०२/२०११ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ९० | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९५अन्वये तयार केलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१०-२०११ सालचे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे मा.आयुक्त सो. सादर करणार असलेले मुळ अंदाजपत्रक (म.न.पा. स्कुल बोर्डासह) विचारार्थ. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १३**

विषय क्रमांक-९० बुधवार दिनांक २३/२/२०११

ठराव क्रमांक-९० बुधवार दिनांक २३/२/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९५अन्वये तयार केलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१०-२०११ सालचे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे मा.आयुक्त सोा. सादर करणार असलेले मुळ अंदाजपत्रक (म.न.पा. स्कुल बोर्डासह) विचारार्थ.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर
जा.क्र.अर्थ / अंदाजपत्रक /६४९/११ दिनांक १८/०२/२०११

**विषय :-** सन २०१०-२०११ चे सुधारित व सन २०११-२०१२ चे मुळ अंदाजपत्रक सादर करणेबाबत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१०-२०११ चे सुधारित व सन २०११-२०१२ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम९६च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तरी अंदाजपत्रक सादर करावयाचे असल्याने दिनांक २३/०२/२०११ रोजी सकाळी ११.३० वाजता या प्रयोजनासाठी मा.स्थायी समिती सभा बोलविण्यात यावी, ही विनंती.

येणेप्रमाणे मा.आयुक्त श्री. संजय काकडे सोा. यांचे पत्र

--**--

मा.स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २३/०२/२०११ रोजी सकाळी ११.३० वाजता मा.स्थायी समिती सभागृह महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारत ,औरंगाबाद रोड येथे भरली असता मा.सभापती साहेब यांनी मा.आयुक्त श्री.संजय काकडे सोा. यांचे सभेमध्ये पुष्प गुच्छ देवुन स्वागत केले व अंदाजपत्रकीय सभेस सुरूवात करणेस सुचित केले.

**मा.आयुक्त श्री. संजय काकडे साहेब :-** मा.स्थायी समिती सदस्य, अधिकारी, कर्मचारी व उपस्थित पत्रकार बंधु यांचे सभेमध्ये स्वागत करतो. मी आज सन २०१०-२०११ सालचे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे मुळ अंदाजपत्रक (म.न.पा. स्कुल बोर्डासह) मा. स्थायी समिती कडेस मंजूरी करिता सादर करीत आहे. त्यास मा.स्थायी समितीने व महासभेने मंजूरी द्यावी. सदर अंदाजपत्रक मंजूरीसाठी मा.स्थायी समितीकडे सादर करणेकामी सभेचे आयोजन करणे विषयी मी दिनांक १८/२/२०११ रोजी मा.सभापती, स्थायी समिती यांना पत्र दिले होते.

परंतु मा.राज्य निवडणुक आयोगाने, अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५१ व ५६ मधील पोटनिवडणुकीचा कार्यक्रम पत्र क्र. रानि आ / म.न.पा./२०११/प्र.क्र.१ का-०५, दिनांक २१/२/२०११ रोजी प्रसिध्द केला असल्याने व सदर प्रभागाची आचारसंहिता दिनांक २१/२/२०११पासून लागु झालेने त्या प्रभागातील विकास कामाबाबत सभेमध्ये चर्चा करण्यांत येउ‍ नये. महानगरपालिकेचे उत्पन्न व उत्पन्नाचे स्त्रोत लक्षात घेवुन खर्च करणे आवश्यक आहे. खर्च वाढविला, व उत्पन्नाचे प्रमाण कमी झाले तर अंदाजपत्रकाप्रमाणे कार्यवाही करणे अशक्य होते. अर्थसंकल्प कोलमडतो त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात उत्पन्नाचे स्त्रोत मर्यादित असल्याने नागरिकांच्या वाढत्या अपेक्षा पुर्ण करता येत नाहीत विकास योजना राबविणेस अडचणी येतात यांचा विचार आवश्यक व्हावा व अंदाजपत्रकास मंजूरी द्यावी.

यानंतर मा.आयुक्तसाहेब यांनी अर्थसंकल्पावरील आपले मनोगत व्यक्त केले तद्‌नंतर मा.सभापती साहेब यांनी मा.स्थायी समितीकडेस सादर झालेल्या अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे करिता मा.स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक२८/०२/२०११ रोजी पुढे सुरू होईल असे सुचित केले.

मा.स्थायी समितीची बुधवार दिनांक २३/०२/२०११ रोजी बोलावलेली व पुढे सोमवार दिनांक २८/२/२०११ व मंगळवार दिनांक १/०३/२०११ रोजी चालू असलेल्या अंदाजपत्रकीय सभेमध्ये मा.स्थायी समिती सदस्य यांनी खालीलप्रमाणे सुचना केल्या व त्यांची मते मांडली.

--**--

**मा.सौ. ढोणे मा. सु. :-** महानगरपालिकेचे मागील अंदाजपत्रका प्रमाणेच हे अंदाजपत्रक आहे. त्यामध्ये बदल व्हावा आपल्या महानगरपालिकेच्या मोक्याच्या जागा ब-याच आहेत तेथे B.O.T. वर विकास प्रकल्प राबवावेत महानगरपालिकेच्या शाळा खोल्या भाडयाने दिल्या आहेत त्या म.न.पा.ने ताब्यात घ्याव्यात. तसेच म.न.पा. हद्दीत बिगर परवानगीने होणारे बांधकामावर कार्यवाही करणेची जबाबदारी निश्चित करावी बिगर परवाना बांधकामावर आकारणी कशी केली जाते ? तसेच कोणकोणत्या कामाची बीले थकीत आहेत त्याची माहिती द्यावी.

**मा.श्री. पवार बा.रे. :-** महानगरपालिकेचे भाडे कराराने दिलेल्या शाळा खोल्यापासून म.न.पा.ला उत्पन्ना मिळत नाही. अतिक्रमण बिगर परवाना बांधकाम पाहिले जात नाही. बिगर परवाना बांधकामावर घरपट्टीची आकारणी कशी करतात.

**मा.उपायुक्त (कर)श्री. देशमुख साहेब :-** बिगर परवाना बांधकामावर दुप्पट दराने कर आकारणी करणे बाबत कार्यवाही करणेत येत आहे.

**मा.श्री. पवार बा. रे.** व **मा.श्री. बारस्कर पो.ज.** :- थकीत देयकाबाबत माहिती सांगावी. निम्मे बजेट मागील थकीत बीले देण्यातच खर्च होते. थकीत बीले का रहातात.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :-** बीले मंजूरी नंतर ती बजेट, बील रजिस्टर ला खतावली जातात. निधी अभावी बीले थकीत रहातात.

**मा.श्री. भोसले ग.पु.** व **मा.श्री. पवार बा.रे. :-** महानगरपालिका हद्दीत दरवर्षी नविन बांधकामे होतात. त्याचे प्रमाण वाढते आहे. त्यावर आकारणी करून घरपट्टी वसुलीचे प्रमाण वाढवावे. मागील अंदाजपत्रकीय सभेचे वेळी ७०% वसुली होईल असे सांगितले गेले होते. परंतु त्या प्रमाणात वसुली झाली नाही. पुर्ण वसुली होत नाही त्यामुळे विकास कामांना निधी अपुरा पडतो. नागरिक तक्रार करतात त्याना सोई सुविधा पुरविता येत नाहीत.

**मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** सर्वसाधारण कर वसुली ४५ कोटी दाखविली आहे. ती वाढवून रूपये ५२ कोटी दाखविण्यांत यावी. घरपट्टी, पाणी पट्टीची थकबाकी वसुल करणेत यावी.

**मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :-** वसुली जास्त दाखविली तर त्या प्रमाणात खर्च वाढता होतो. वसुली मात्र होत नाही विकास कामासाठी निधी अपुरा पडतो.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** नागरिक पैसे भरण्यासाठी येतात पण कर्मचारी नसतात. त्यांचे वर कार्यवाही करावी वसुलीचे प्रमाण वाढवावे.

**मा.सभापती साहेब :-** सर्व साधारण कर वसुली ४५ कोटी ऐवजी ५२ कोटी करणेस शिफारस करण्यांत यावी.

**मा.उपायुक्त (कर) श्री. देशमुख :-** मालमत्ता नांव नोंदणी कामी इमारत व जमिनीचे किंमती वर एक टक्का या दराने फी आकारणी करणेस मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे त्यास मंजूरी मिळावी.

**मा.सभापती साहेब :-** मालमत्ता हस्तांतरणासाठी जागेचे व इमारतीचे किंमती वर एक टक्का या प्रमाणे मालमत्ता नाव नोंदणी आकारणी करणेस मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. पवार बा.रे.** व **मा.सौ. ढोणे मा.सु. :-** महानगरपालिका हद्दीत लागणारे अनाधिकृत जाहिरात बोर्डवर कार्यवाही करावी. स्वागत वाढदिवस इत्यादीचे बरेच बोर्ड लावले जातात. त्यावर आकारणी करावी.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** सर्वावर कर आकारणी करावी.

**मा.उपायुक्त (कर) श्री. देशमुख साहेब :-** महानगरपालिकेचे मालकीच्या जागेतील व्यापारी संकुलातील गाळयांचे हस्तांतरण करणेकामी आकारणी करणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. तो पुढिल प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभाग समिती कार्यालय क्र.१, सावेडी | रूपये १.५० लाख प्रति गाळा |
| २ | प्रभाग समिती कार्यालय क्र.२, शहर | रूपये १.०० लाख प्रति गाळा |
| ३ | प्रभाग समिती कार्यालय क्र.३, झेंडीगेट | रूपये १.०० लाख प्रति गाळा |
| ४ | प्रभाग समिती कार्यालय क्र.४, बुरूडगाव, केडगाव | रूपये १.०० लाख प्रति गाळा |

याप्रमाणे म.न.पा.च्या मालकीच्या जागेतील व्यापारी संकुलातील गाळयांचे हस्तांतरण करणेकामी आकारणी करणेस मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे त्यास मंजूरी मिळावी. त्यामुळे म.न.पा.ला उत्पन्न मिळेल.

**मा.सभापती साहेब :-** महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतील व्यापारी संकुलातील गाळयाचे हस्तांतरण करणेकामी रूपये १ लाख प्रती गाळा याप्रमाणे आकारणी करणेस शिफारस करण्यांत यावी. म.न.पा.चे मार्केट विभागाकडून रस्ता बाजू फी वसुली ही दिवसेदिवस कमी कमी होत चालली आहे. मा.आयुक्त साहेब यांनी रस्ता बाजू फी वसुली कर्मचा-यांवर कार्यवाही करण्याची सूचना केली तर वसुली जास्त होते. मार्केट विभागाचे रस्ता बाजू फी वसुली ठेका देणेकामी टेंडर काढले होते. तेव्हा उत्पन्न रूपये ६० लाख धरून टेंडर काढले पण कुणीही ते भरले नाही.

**मा.श्री. पवार बा.रे.** व **मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** महानगरपालिकेचे कर्मचा-याकडून वसुली होते नाही ठेक्याची रक्कम कमी करून रस्ता बाजू फी वसुलीचा ठेका द्यावा.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** रूपये २५ किंवा ३० लाख रस्ता बाजू फी निश्चित करून रस्ता बाजू वसुली कामी ठेका देणेसाठी टेंडर काढावे.

**मा.सभापती साहेब :-** रस्ता बाजू फी वसुली चा ठेका देणेकामी रस्ता बाजू फी रूपये २५ लाख निश्चित करण्यास शिफारस करण्यांत यावी. जमा बाजूस,मार्केट व स्लॉटर फी म्हणजे रस्ता बाजू फी रूपये २५ लाख दाखवावी तसेच सन २००७-०८ , २००८-०९, व सन २००९-२०१० सालची मार्केट विभागाकडील रस्ता बाजू फी वसुली फारच कमी झालेली आहे. त्याकामी प्रशासनाने उपायुक्त (सा.) यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमावी महानगरपालिकेचे झालेले नुकसान संबंधीताकडून वसुल करणेची कार्यवाही करावी. महानगरपालिकेचे गाळे, शाळा खोल्याचे भाडे, वसुली कामी मार्केट विभागाने काळजी न घेता त्या कडे दुर्लक्ष केले. म.न.पा. च्या शाळा खोल्या, शॉपींग सेंटर मधील गाळयाचे भाडे वसुलीकडे दुर्लक्ष करू नये. संपूर्ण भाडे वसुली करावी.

**मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** गाळा भाडयात वाढ करावी.

**मा.उपायुक्त (कर) श्री. देशमुख साहेब :-** महानगरपालिकेचे शॉपींग सेंटर मधील गाळयाचे फेर कराराबाबत व गाळे ताब्यात घेणेबाबत कार्यवाही सुरू केलेली आहे.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-**महानगरपालिकेचे सौभाग्य सदन मंगल कार्यालयाचे नुतणीकरण करावे. भाडे न देण्या-या संस्थाना दिलेल्या शाळा खोल्या म.न.पा.ने ताब्यात घ्याव्यात. शाळा क्रमांक ३मधील ज्युडो कराटेसाठी दिलेल्या खोल्या ताब्यात घेवुन त्या रचना कला विद्यालयास देण्यांत याव्यात.

**शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :-** सौभाग्य सदन मंगल कार्यालयाचा B.O.T. चा प्रस्ताव तयार केलेला आहे. म.न.पाचे मंगल कार्यालयाचे व रस्ता फोडणेचे चार्जेस मध्ये वाढ करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास मंजूरी मिळावी.

**मा.सौ.ढोणे मा.सु.:-**गोरगरिब म.प.पा.ची मंगल कार्यालये वापरतात त्यामुळे भाडे वाढ करू नये.

**मा.उपायुक्त(कर)श्री. देशमुख साहेब :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीची मंगल कार्यालये व सभागृहाचे दैनंदिन भाडे डिपॉझीटचे सध्याचे प्रचलित दर व प्रस्तावीत दर पुढिल प्रमाणे

| **अ.क्र.** | **कार्यालयाचे नांव** | **सध्याचे प्रचलित दर** | | **प्रस्तावित दर** | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | **भाडे** | **डिपॉझीट** | **भाडे** | **डिपॉझीट** |
| १ | डॉ. महाले मंगल कार्यालय | १४८९/- | १३५०/- | २२००/- | १३५०/- |
| २ | शिवपवन मंगल कार्यालय | ३३०९/- | १०००/- | ४०००/- | १०००/- |
| ३ | भाग्योदय मंगल कार्यालय | ६६१८/- | -- | ७५००/- | ५००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | सावेडी क्रीडा संकुल सांस्कृतिक कार्यक्रम | भाडे रू. १०००/-<br>सेवाकर रू.१००/-<br>शिक्षण कर रू. २/-<br>उपकर रू.१/-<br>एकुण रू.११०३/- | | १५००/-<br>सेवाकर,<br>शिक्षणकर<br>व<br>उपकरासह | |
| ४ | व्यावसायिक कार्यक्रम | भाडे रू.५०००/-<br>सेवाकर रू.५००/-<br>शिक्षणकर रू.१०/-<br>उपकर रू.५/-<br>एकुण रू.५५१५/- | | १००००/-<br>सेवाकर,<br>शिक्षणकर<br>व<br>उपकरासह | |
| ५ | आंबेडकर स्मारक | ५५३/- | -- | ७५०/- | ५००/- |
| ६ | महावीर कलादालन | ५५२/- | -- | ७५०/- | ५००/- |
| ७ | जुने महानगरपालिका सभागृह | १२१३/- | -- | १५००/- | ५००/- |

यាप्रमाणे दरवाढ प्रस्तावीत केली असून मा.शासन निर्णय क्र.जमीन १०/२०००/प्र.क्र.९१ज१ दि.२७ एप्रिल२००० नुसार डांबरी रस्ता फोडणेचे मंजूर दर प्रति मिटर रूपये ७५०/- असे असून त्यामध्ये वाढ करणे योग्य वाटते. त्यानुसार डांबरी रस्ता फोडणेचे प्रति मिटर रूपये १५००/- इतके दर सुचविले आहे त्यास मंजूरी द्यावी.

**मा. सभापती साहेब :-** महानगरपालिकेचे मंगल कार्यालयाचे भाडे व रस्ता फोडणेचे चार्जेस खालील प्रमाणे आकारण्यास शिफारस करण्यांत यावी.

| **अ.क्र.** | **कार्यालयाचे नांव** | **प्रस्तावित दर** | |
|---|---|---|---|
| | | **भाडे** | **डिपॉझीट** |
| १ | डॉ. महाले मंगल कार्यालय | ३०००/- | १३५०/- |
| २ | शिवपवन मंगल कार्यालय | ४५००/- | १०००/- |
| ३ | भाग्योदय मंगल कार्यालय | ७५००/- | ५००/- |
| ३ | सावेडी क्रीडा संकुल सांस्कृतिक कार्यक्रम | २०००/-<br>सेवाकर,<br>शिक्षणकर व<br>उपकरासह | |
| ४ | व्यावसायिक कार्यक्रम | १००००/-<br>सेवाकर,<br>शिक्षणकर व<br>उपकरासह | |
| ५ | आंबेडकर स्मारक | १०००/- | ५००/- |
| ६ | महावीर कलादालन | १५००/- | ५००/- |
| ७ | जुने महानगरपालिका सभागृह | २०००/- | ५००/- |

याप्रमाणेचे प्रस्तावीत दरास व रस्ता फोडणे प्रति मिटर दर रूपये १५००/-इतके आकारणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत यावी. महानगरपालिकेचे नवीन प्रशासकीय इमारती मधील सभागृह मा. जिल्हाधिकारी साहेब यांचेकडील कार्यक्रम व अहमदनगर महानगरपालिकेच्या कार्यक्रमा व्यतिरिक्त कुणालाही कुठल्याही कार्यक्रमासाठी भाडे तत्वावर देण्यात येवु नये.

**मा.श्री. पवार बा.रे. :-** पावसाळयाचे दिवसात इतर वेळी घडणा-या अकस्मीक घटनासाठी आपतकालीन व्यावस्थापन खर्च तरतुद कमी दाखविलेली आहे ती वाढवावी.

**मा.श्री.भोसले ग.पुं.:-**पावसाळयाचे दिवसात ऐनवेळी म.न.पा.चे पोर्टेबलपंप चालत नाही.ऐनवेळी अडचणी येतात पोर्टेबलपंप भाडेकराराने मिळणेसाठी वार्षिक टेंडर काढावे. पावसाळया मध्ये उद्‌भवणा-या अडचणी निवारणेची तजविज आताच करावी आपतकालीन तरतुद वाढवावी.

**मा.सभापती साहेब :-** आपतकालीन व्यवस्थापन आकस्मिक खर्चासाठी केलेली तरतुद वाढवून रूपये १० लाख करावी. म.न.पा.चे पंप चालु आहेत याची तपासणी करावी ते चालू रहातील याची काळजी घ्यावी.

**मा.श्री. बारस्कर पो.ज.** व **मा.श्री. पवार बा.रे. :-** पाणीपट्टी संबंधी कोर्ट कसेसे नाहीत. तेव्हा संपूर्ण पाणी पट्टीची वसुली करावी. बोगस नळ कनेक्शन फार आहेत त्यावर दंड आकारणी करून वसुली वाढवावी.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** कागदपत्रे कमी करून नळ कनेक्शन देणेत यावे नळ कनेक्शन देणेची प्रक्रिया सोपी करावी.

**मा.सभापती साहेब :-** बेकायदेशीर नळ कनेक्शन संबंधी कार्यवाही कडक करावी. पाणीपट्टी वसुली थकबाकी राहु देवु नये. पाणीपट्टी वसुली जमा बाजूस रूपये १५कोटी २८ लाख ३० हजार वसुली दाखवावी. घरपट्टी पाणीपट्टी वसुली ७०% केली तरच कर्मचा-यांना सहावे वेतन आयोगाचा फरक देणेबाबत विचार करावा. सहावे वेतन आयोग अग्रीम / फरक या लेखाशिर्षावरील तरतुद रूपये १ कोटी ९२ लाख करण्यांस शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. पवार द.ज.** व **मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** कुत्र्यांचे निर्बीजीकरणासाठी नेमलेल्या अभिकर्ता संस्थेचे काम चांगले नाही त्यानी केलेल्या शस्त्रक्रियाची संख्या पहाता महानगरपालिका हद्दीतील फिरत्या कुत्र्यांची संख्या कमी झाली पाहिजे परंतु त्याचे उलटेच होतांना दिसते. रोगट कुत्रे जास्त दिसतात. त्याच्यावर उपचार करावेत.

**मा.श्री. पवार बा.रे. :-** महानगरपालिकेने २व्हेटनरी डॉक्टर, १० कर्मचारी नेमून उनाड कुत्र्याचे निर्बीजीकरण करावे त्यांचा बंदोबस्त करावा.

**मा.सभापती साहेब :-**महानगरपालिकेने १ व्हेटनरी डॉक्टर व २सहाय्यक कर्मचारी नेमून त्यांचेकडून फिरत्या उनाड कुत्र्यांचे निर्बीजीकरण करून त्याचा बंदोबस्त करावा.उनाड कुत्री बंदोबस्त व दंशावर उपचार या लेखाशिर्षा वरील तरतुद कमी करून रूपये१० लाख करणेस शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** मागील अंदाजपत्रकीय सभेमध्ये स्थायी समितीने ठराव केला होता की, सर्व वॉर्ड मधील इलेक्ट्रीक मेन्टेनन्स साठी रूपये ५० हजार प्रत्येकी याप्रमाणे खर्च समप्रमाणात करावा. असे ठरले होते त्याप्रमाणे अंमलबजावणी झाली नाही.

**मा.श्री. पवार द.ज.** व **मा.श्री. पवार बा.रे. :-** इलेक्ट्रीक साहित्य वेळचे वेळी मिळत नाही नागरिक तक्रार करतात हद्द वाढीचे भागात आवश्यक तेथे इलेक्ट्रीकची सोय करावी.

**मा.श्री. भोसले ग. पुं. :-** महानगरपालिकेचे झोन वाईज खर्च सम प्रमाणात करावा. झोन वाईज मटेरिअल देणेचे करावे. झोन मधील साहित्य त्याच झोनमध्ये वापरले जावे.

**मा.सौ. ढोणे मा.सु. :-** वायरमनची संख्या वाढवावी.

**मा.सभापती साहेब :-** विद्युत साहित्य खरेदी कामी केलेली तरतुद रूपये ५ लाखाने वाढवून ४० लाख करावी सदर खर्च झोन वाईज सम प्रमाणात करावा. झोन कार्यालयामध्ये इले. साहित्य स्पेअर मध्ये ठेवण्यांत यावे. झोन करिताचे इले. साहित्य त्याच झोन साठी वापरावे. १५० वॅट सोडीयम व्हेपर पोल टाकणे करितांची तरतुद वाढवून रूपये १५ लाख करणेस तसेच नविन इले. पोल, स्ट्रीट लाईट स्पॅन फिटींग करिताची तरतुद ही १०लाखाने वाढवून २० लाख करणेस शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. पवार बा.रे.** व **मा.श्री. पवार द.ज. :-** गटर दुरूस्ती खर्च ही वार्ड वॉईज करावा असे ठरले होत. परंतु खर्च झोन वाईज केला वेळचे वेळी ड्रेनेजची झाकणे ही मिळत नाहीत.

**मा.श्री. पवार बा.रे.** व **मा.श्री. भोसले ग. पुं. :-** आरोग्य विभागाकडील कामगार गमबुट वापरत नाहीत, मास्क वापरत नाहीत ते कंम्पलसरी करावे कचरा ढकल गाडया एका ठिकाणी पडून असतात. वापर न होताच त्या दुरूस्तीला आलेल्या आहेत. कंटनेर नादुरूस्त आहेत. भाडयाचे ट्रॅक्टर कुठे कुठे जातात. त्याचे रेकॉर्ड आहे का?

**मा.सभापती साहेब :-** सफाई कर्मचा-यांना कामाचे वेळी गमबुट मास्क वापरणे कंम्पलसरी करावे. गटर दुरूस्ती खर्च कमी करून रूपये २० लाख करणेस शिफारस करण्यांत यावी.

**उपआरोग्याधिकारी डॉ.श्री. पैठणकर एन.एस.:-** ट्रॅक्टर, घंटागाडया प्रभाग वाईज दिलेल्या आहेत. ढकलगाडयाचे दुरूस्तीसाठी खर्च वाढवावा लागेल. कंटनेर दुरूस्ती मोटार व्हेईकल विभागामार्फत होते. नविन ट्रॅक्टर खरेदीचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** कंटनेर खरेदी करावे आमचे भागात ते देण्यांत यावे.

**मा.श्री. पवार बा.रे.** व **मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** समिक्षा कंन्स्ट्रक्शनला आपण दंड केला पण शहरातील कच-याची समस्या जशीचे तशीच आहे.

**उपआरोग्याधिकारी डॉ.श्री. पैठणकर एन.एस :-** कचरा वाहतूक करणारे कमी कचरा नेतात. रिकाम्या गाडया जातात म्हणून दंड आकारणीची कार्यवाही सुरू केलेली आहे.

**मा.श्री. पवार बा.रे.** व **मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतूक करणे कामीचा ठेका समिक्षा कंन्स्ट्रक्शनला दिला होता परंतु त्यांनी चांगले काम केले नाही म्हणून त्याचा ठेका रद्द केला आता रूपये १ कोटीची तरतुद केलेली आहे.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** झोन वाईज प्रस्ताव करावे, जेथे जास्त कचरा असतो. त्या भागाचा ठेका लवकर काढावा.

**मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** तरतुदी मध्ये किती वाढ करावयास हवी

**उपआरोग्याधिकारी डॉ.श्री. पैठणकर एन.एस :-** रूपये ३ कोटीने तरी वाढवावी लागेल.

**मा.सभापती साहेब :-** चारही झोनचे एकत्रीत प्रस्ताव ठेवण्यात यावे. खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक करणे करिता करण्यांत आलेली तरतुद वाढविण्यांस शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** संत गाडगेबाबा स्वच्छता व सेवा अभियान या अभियाना अंतर्गत आपले महानगरपालिकेमध्ये कार्यवाही केली जाते का ?

**उपआरोग्याधिकारी डॉ.श्री.पैठणकर एन.एस:-** संत गाडगेबाबा स्वच्छता व सेवा अभियाना अंतर्गत घेतलेल्या स्पर्धाकरिता इतर महानगरपालिकेमध्ये जाणे.तसेच इतर महानगरपालिकेतील अधिकारी आपले महानगरपालिकेत आल्यास त्यासाठी व स्पर्धा बक्षीसाकरिता सदर तरतुद केलेली आहे.

**मा.श्री. पवार बा.रे.** व **मा.श्री. भोसले ग.पुं. :-** संत गाडगेबाबा स्वच्छता व सेवा अभियान या अंतर्गत आपले महानगरपालिकेमध्ये स्पर्धा आयोजित करावी अभियान राबवावे संत गाडगेबाबा स्वच्छता व सेवा अभियान खर्च तरतुद वाढवावी.

**मा.सभापती साहेब :-** संत गाडगेबाबा स्वच्छता व सेवा अभियान खर्च तरतुद वाढविण्यांस शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. बारस्कर पो.ज.** व **मा.श्री. पवार द.ज. :-** रक्त पेढी वैद्यकीय अधिकारी व तत्रज्ञ यांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणे कामी तरतुद करण्यांत आलेली नाही.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.श्री. बोरगे ए.ए. :-** तरतुद करणे आवश्यक आहे.

**मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** तरतुद रूपये १० लाख करण्यांस शिफारस करण्यांत यावी.

**मा.सभापती साहेब :-** वैद्यकीय अधिकारी व तत्रज्ञ यांचे मानधनावर नेमणूक करण्यांस व त्यांचे मानधन वाढवून देण्यास पूर्वी मंजूरी दिलेली आहे. मानधनावर कंत्राटी पध्दतीने डॉक्टर नेमणे कामी वर्तमान पत्रात लवकर जाहिरात देण्यात यावी. रक्तपेढी वैद्यकीय अधिकारी व तत्रज्ञ यांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणे कामीची तरतुद रूपये १० लाख करण्यांत यावी.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.श्री. बोरगे ए.ए.:-** अहमदनगर महानगरपालिकेचे दवाखाने रूग्णालये व फिरता दवाखाना येथील दरवाढी बाबत व म.न.पा.चे कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे कार्यानुभव व प्रशिक्षणासाठी येणा-या नर्सिग इन्स्टटियुट मधील विद्यार्थ्याकडून शुल्क आकारणीचा प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेला आहे त्यास मंजूरी मिळावी.

**मा.सभापती साहेब :-** प्रशासनाने सादर केले प्रमाणे सदरचे दोनही प्रस्ताव मंजूर करणेस शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री.पवार बा.रे.:-** नविन शववाहिनी खरेदी कामी तरतुद केलेली नाही महानगरपालिकेची शववाहिनी असणे आवश्यक्त आहे.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** शववाहिनी खरेदी कामी रूपये ५ लाख तरतुद करावी.

**मा.सभापती साहेब :-** नविन शववाहिनी खरेदी कामी रूपये ५ लाखाची तरतुद करणेस शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. भोसले ग. पुं. :-** महानगरपालिकेचे बी.डी.सी.डी. हॉस्पीटीलची इमारत गळते आहे. तेथे नविन हॉस्पीटलचे बांधकाम होईपर्यत पेशन्टचे वॉर्डची दुरूस्ती करावी. तेथील W.C. बाथचे लिकेज काढावे किंवा नविन इमारतीचे बांधकाम तातडीने करावे.

**मा.श्री. पवार बा.रे. :-** जेंडर बजेट महिला व बाल कल्याण कार्यक्रम खर्च ५% प्रमाणेची तरतुद रूपये २कोटी १०लाख केलेली आहे. त्या निधी मधून कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना इमारतीचे बांधकाम करणेकामी रूपये १ कोटी ५० लाखाची तरतुद करावी.

**मा.सभापती साहेब :-** जेंडर बजेट महिला व बाल कल्याण कार्यक्रम खर्च ५% चे तरतुदी मधून कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना इमारतीचे बांधकाम करण्यांस शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** एड्स विषयक जनजागृती करणे कामी केलेली तरतुद कमी आहे. सदर रोगाचे निर्मुलनासाठी संपूर्ण जगामध्ये किती प्रसार प्रचार होत आहे. महानगरपालिकेने ही सदर कामी भरीव कार्य करावे.

**मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** रस्ते दुरूस्ती (पॅचिंग व मुरूम टाकणे) साठी रूपये ६० लाखाची तरतुद केलेले आहे. सदर खर्च महानगरपालिकेचे सर्व प्रभागासाठी होत नाही. उपनगराकरिता तो होत नाही. तो झोन वाईज करण्यात यावा.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** पॅचिंगची कामे सगळी कडील होत नाहीत. फक्त मुरूम टाकला जातो त्यासाठीच तरतुद ठेवावी.

**मा.सभापती साहेब :-** महानगरपालिकेचे चारही झोन करिता समान रूपये १५ लाखाप्रमाणे तरतुद करणेस शिफारस करण्यांत यावी. झोन वाईज खर्च करावा.

**मा.श्री. पवार बा.रे. :-** कॉक्रीटीकारणाची कामे मा.महापौर निधी नगरसेवक निधीतुन ही करण्यांत येतात. त्यामुळे रस्ते कॉक्रीटीकरण या कामी केलेली तरतुद कमी करावी.

**मा.श्री. पवार बारस्कर पो.ज. :-** रूपये १ लाख तरतुद करावी.

**मा.सभापती साहेब :-** रस्ते कॉक्रीटी करण या लेखाशिर्षावर केलेली रूपये २५ लाखाची तरतुद कमी करून ती रूपये १ लाख करणेस शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** जिजामाता दवाखान्याचे इमारतीची दुरूस्ती करावी. महानगरपालिका कर्मचारी यांचे त्रिदल इमारतीची दुरूस्ती करावी आपले महानगरपालिका अधिका-यांची जुनी मागणी आहे.

**मा.सभापती साहेब :-** जिजामाता दवाखाना इमारत दुरूस्तीसाठी तरतुद करणेस शिफारस करण्यांत यावी. त्रिदल इमारतीची दुरूस्ती प्राधान्याने करावी.

**मा.श्री. भोसले ग.पुं.** व **मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** महानगरपालिके करिता १ नवीन जे.सी.बी. खरेदी करावा. जे.सी.बी. भाडे जास्त येते.

**मा.श्री. पवार बा.रे. :-** सावेडी उपनगरात एखादे क्रिडांगण विकसीत करावे.

**मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** महापौर चषक स्पर्धा सन २०१०-११चे करिता रूपये १० लाख व सांस्कृतिक कार्यक्रम घेणे करिता रूपये २०लाख तरतुद केलेली आहे. सांस्कृतिक कार्यक्रम घेणे करिताची तरतुद वाढवावी.

**मा.सभापती साहेब :-** महापौर चषक स्पर्धा सन २०१०-११करितांची तरतुद कमी करून रूपये ६ लाख करणेस सांस्कृतिक कार्यक्रम घेणेसाठीची तरतुद वाढवून रूपये ३० लाख करणेस शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** सीना नदी पात्रातील अतिक्रमणे, अडथळे हटविणे, साफ सफाई करणे कामीची तरतुद वाढवावी. नदी पात्रातील काढलेला गाळ तेथून लगेच उचलण्यांत यावा.

**मा.सभापती साहेब :-** सिना नदी पात्रातील अतिक्रमणे, अडथळे हटविणे,साफ सफाई करणे कामीची तरतुद वाढवून रूपये १५ लाख करण्यांत यावी. नदी पात्रातील काढलेला गाळ तेथून वाहून नेण्याची ही व्यवस्था त्याच वेळेस करण्यांत यावी.

**प्रशासनाधिकारी मनपा शिक्षण मंडळ :-**मा.शासनाकडून जिल्हा परिषद व महानगरपालिका शाळा मधील विद्यार्थ्याना गणवेश देणे करिता निधी प्राप्त झालेला असलेने म.न.पा. शाळेतील फक्त ओपनचे विद्यार्थ्यांना गणवेश देणे कामी रूपये १ लाख ५० हजार तरतुद ठेवावी व नविन शाळाखोल्या करिता बेंच खरेदी साठी तरतुद वाढवावी ती रूपये ३ लाख ५० हजार ठेवावी तसेच शालेय क्रिडा स्पर्धा करिता ची तरतुद वाढवावी, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी रूपये १ लाखची तरतुद वाढवून रूपये २ लाख करावी. म.न.पा. शाळेतील विद्यार्थ्यांना वर्षातुन एकदा भोजण देणे करिता व शालेय डायरी साठी तरतुद करावी. अेव्ही रूमसाठी ची तरतुद रूपये दीड लाखाने वाढविण्यांस शिफारस करण्यांत यावी.

**मा.सभापती साहेब :-** त्याप्रमाणे तरतुद करण्यांस शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** महानगरपालिकेचे शाळांना रंग देणे इमारतीचे सुशोभिकरण इत्यादीची कामे करण्यांत यावी.

**मा.श्री.भोसले ग.पुं.:-** बुरूडगाव रोड वरील महानगरपालिकेचे शाळे करीता वीज मिटर घेण्यात यावे.

**मा.श्री. बास्कर पो.ज. :-** महानगरपालिका हद्दीत टँन्करद्वारे पाणी पुरवठा करणेकामी केलेली तरतुद कमी करावी.

**मा.सभापती साहेब :-** रूपये २५ लाख तरतुद करण्यांस शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. पवार द.ज. :-** रस्ते डांबरीकरण व नुतणी करणासाठी रूपये ५० लाखाची तरतुद केलेली आहे. त्या मध्ये बालीकाश्रम रस्त्याचे डांबरीकरणासाठी वाढीव तरतुद करावी.

**मा.सभापती साहेब :-** रूपये ६० लाख तरतुद करणेची शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. पवार बा.रे.** व **मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** बोल्हेगांव ते सावेडी गावठाण रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी घेण्यात यावा.

**मा.सभापती साहेबः-** विराज कॉलनी अंतर्गत रस्ते ते नगर-मनमाड हायवे पर्यत पोहोच रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणेकामी रूपये२५लाख **व** इक्रा स्कुल परिसरातील रस्ते, नगर-औरंगाबादरोड हायवे पर्यत पोहोच रस्ता डांबरीकरण करणेकामी रूपये२० लाखाची तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** वडगावं रोड ते अर्थव रो. हौसिंग सोसायटी ते यश रो. हौसिंग सोसायटी ते जय मंगल नगरी पर्यत रस्त्याचे व मनमाड हायवे ते नागापुर गांवठाणापर्यत रस्ता डांबरीकरण व मजबुतीकरणासाठी रूपये ५० लाखाची तरतुद करावी. या रस्त्यांची कामे तातडीने करण्यांत यावीत.

**मा.श्री. पवार द.ज. :-** प्र.क्र.२६ मधील कवडे नगर पारिजात कॉलनी, नगर-मनमाड रोडला जोडणारा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी रूपये २५ लाख **व** महावीर नगर ते भिंगारदिवे चाळ नगर-मनमाड रोड जोडणारा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी रूपये २० लाखाची तरतुद करणेस शिफारस करण्यांत यावी. या दोन रस्त्यांची कामे लवकरात लवकर करण्यांत यावीत.

**मा.श्री. पवार बा.रे. :-** प्र.क्र. ४ मधील जुना पिंपळगाव रस्ता ते भिस्तबाग शिव रस्ता व तपोवन रस्ता व संचारनगर माउलीनगर अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डंबरीकरणासाठी रूपये ३० लाख **व** नामदेव चौक ते नित्यसेवा ते भगवानबाबा चौक ते तपोवन रोड पर्यतचा रस्ता मजबुतीकरण

व डांबरीकरणासाठी रूपये ३५ लाखाची तरतुद करणेस शिफारस करण्यांत यावी. या दोन रस्त्याचे कामे करण्यांत यावीत.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** बुरूडगांव रोड वरील पुणे हायवे ते चाहुराणा ब्रद्रुक ते आदर्शपार्क, पुणे हायवे ते विनायकनगर व बुरूडगांव रोड ते बालाजी कॉलनी सर्व जोड रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी रूपये ५० लाखाची तरतुद करावी. या रस्त्याचे काम लवकर करण्यांत यावीत.

**मा.सभापती साहेब :-** माझ्याकडेस मा. नगरसेवकांनी त्याचे वॉर्डमधील सुचविलेली कामे पुढीलप्रमाणे प्र.क्र. ७ मधील सावेडी येथील स.नं. ८७ मधील अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी रूपये १५ लाख **व** प्र.क्र. २ मधील भिस्तबाग येथील स.नं. २३,११,१२ मधील अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी रूपये २० लाख **व** प्र.क्र. १ मधील पवननगर येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे, गोकुळनगर येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे, गजरात फॅक्टरी ते बारस्कर घर ते महालापर्यत ररत्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरणाची कामे **व** प्र.क्र.३८ मधील वारूळाचा मारूती रस्ता व दातरंगे मळा परिसर रस्ते मजबुतीकरणासाठी रूपये २० लाखाची तरतुद करणेस **व** गांधी मैदान परिसरातील आतील भागाचे सिमेंट कॉक्रीटीकरण, सुशोभिकरण, इलेक्ट्रीक व्यवस्थासाठी तरतुद करणेस शिफारस करण्यांत यावी. प्र.क्र. २२ मधील गोविंदपुरा, यशवंत कॉलनी, विराज कॉलनी, यशवंत नगर, (शहा कॉलनी) शितल कॉलनी, पठाण कॉलनी, गोकुळनगरी, इक्रा स्कुल परिसर, रहेमिनया कॉलनी, मोठी मरियम मस्जिद परिसर या ठिकाणी १५० वॅट सोडीयम व्हेपर बसविणेसाठी रूपये १० लाखाची तरतुद करणेस शिफारस करण्यांत यावी. या कामांसाठी आवश्यक तरतुद करून कामे प्राधान्याने करण्यांत यावी.

**मा.श्री. पवार बा.रे. :-** मा.आयुक्त साहेब यांनी अंदाजपत्रकामध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या हद्दवाढीमधील गावात नवीन एक तरी पोहच रस्ता व्हावा अशा उद्देशाने रूपये २ कोटीची कामे सुचविलेली आहेत. परंतु सदर कामाची यादी पहाता विशिष्ट भागामध्ये व शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये कामे सुचविलेली दिसतात. तरी मा.आयुक्त साहेबांच्या अपेक्षा प्रमाणे हद्दीवाढी मधील गावांच्या पोहच रस्त्याचा समावेश करावेत यावेत. यामध्ये प्रामुखाने, जुना पिंपळगाव रस्ता, व संचारनगर रस्ता तसेच निर्मलनगर परिसराला जोडणारा मुख्य रस्ता या कामांचा सदर यादी मध्ये समावेश करणेत यावा.

**मा.सभापती साहेब :-** मा.आयुक्त साहेब यांनी अंदाजपत्रकामध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या हद्दवाढीतील गावात नविन एक तरी रस्ता व्हावा या उद्देशाने रूपये २ कोटीची कामे सुचविली आहेत. त्या ऐवजी सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात हद्दवाढीतील गावाकरिताआवश्यक पोहोच रस्ते विकसीत करणेकरीता खालीलप्रमाणे प्रस्तावीत कामांची शिफारस करण्यांत येत आहे. त्याकमी रूपये ३ कोटीची तरतुद करणेस शिफारस करण्यांत यावी.

| अ..क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | विराज कॉलनी अंतर्गत रस्ते ते नगर-मनमाड हायवे पर्यत पोहोच रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत | रू.२५,००,०००/- |
| २ | इक्रा स्कुल परिसरातील रस्ते नगर-औरंगाबाद रोड हायवे पर्यत पोहोच रस्ता डांबरीकरण करणेबाबत | रू.२०,००,०००/- |
| ३ | बुरूडगांव रोड वरील पुणे हायवे ते चाहुराणा बुद्रुक ते आदर्श पार्क, पुणे हायवे ते विनायकनगर व बुरूडगाव रोड बालाजी कॉलनी सर्व जोड रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत | रू.४०,००,०००/- |
| ४ | वडगाव रोड ते अर्थव रो. हौसिंग सोसायटी ते यश रो. हौसिंग सोसायटी ते जय मंगल नगरी पर्यत रस्ता डांबरीकरण व मजबुतीकरण करणेबाबत. | रू. २०,००,०००/- |
| ५ | मनमाड हायवे ते नागापूर गावठाणा पर्यत रस्ता डांबरीकरण व मजबुतीकरण करून मिळले बाबत. | रू. २०,००,०००/- |
| ६ | कवडेनगर पारिजात कॉलनी नगर-मनमाड रोडला जोडणारा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत. | रू. २०,००,०००/- |
| ७ | महावीर नगर ते भिंगारदिवे चाळ नगर-मनमाड रोड जोडणारा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत | रू.२०,००,०००/- |
| ८ | जुना पिंपळगाव रस्ता ते भिस्तबाग शिव रस्ता व तपोवन रस्ता व संचारनगर माउलीनगर अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डंबरीकरण करणेबाबत. | रू.२०,००,०००/- |
| ९ | नामदेव चौक ते नित्यसेवा ते भगवानबाबा चौक ते तपोवन रोड पर्यतचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत | रू.२५,००,०००/- |
| १० | सारसनगर मधील व्ही.डी.ओकॉन ते वाकोडी रोड पर्यत रस्त्याचे मजबुतीकरण करणेबाबत. | रू.२०,००,०००/- |
| ११ | सोलापूर रोड शांतीनगर ते नामगंगा पर्यत रस्त्याचे मजबुतीकरण करणेबाबत | रू. १५,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| १२ | सावेडी राजनगर ते एकविरा चौक पर्यत रस्त्याचे मजबुतीकरण करणेबाबत. | रू. २५,००,०००/- |
| १३ | सावेडी येथील स.नं. ८७ मधील अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत. | रू.७,००,०००/- |
| १४ | भिस्तबाग येथील स.नं. २३,११,१२ मधील अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत. | रू. ७,००,०००/- |
| १५ | पवननगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत | रू.७,००,०००/- |
| १६ | वारूळाचा मारूती रस्ता व दातरंगे मळा परिसर रस्ते मजबुतीकरण करणेबाबत | रू. ९,००,०००/- |
| | **एकुण** | **रू. ३,००,००,०००/-** |

**मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** अधिकारी यांचे निवास बांधणे व सोई सुविधा या लेखाशिर्षावर रूपये २० लाखाची तरतुद केलेली आहे. मागील वर्षी मा.महापौर / मा.आयुक्त यांचे निवास्थानाचे बांधकाम केलेले नाही.

**मा.सभापती साहेब :-** अधिकारी यांचे निवास बांधणे व सोई सुविधा या लेखाशिर्षावरील तरतुद कमी करून ती फक्त रूपये १० लाख ठेवण्यांस शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** हिराबाई भापकर पुतळा सुशोभिकरण करावे. वॉर्ड क्रमांक ६०करिता गार्डन विकसीत करणेसाठी रूपये ५ लाख निधीची तरतुद करावी.

**मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** स्मशान भुमी सुधारणा व नविन स्मशान भूमी करीता रूपये १० लाखाची तरतुद केलेली आहे. त्यामधून नागापुर शाळे लगत असलेल्या दोन एकर जागेमध्ये स्मशानभुमी करावी.

**मा.श्री. पवार द.ज. :-** सावेडी करिताचे स्मशानभुमीसाठी तरतुद करावी.

**मा.सभापती साहेब :-** स्मशानभुमी सुधारणा व नविन स्मशान भुमी करिता रूपये २० लाख तरतुद करावी. सावेडी, नागापुर चे स्मशानभुमी करिता सम प्रमाणाप्रमाणेचे खर्चास शिफारस करण्यांत यावी. हिराबाई भापकर पुतळा सुशोभिकरणा करिता तरतुद करावी. चौक सुधारणा मध्ये अप्पु हत्ती चौक, शिवाजी चौक, टिळक रोड चौक, श्रीराम चौक, येथील चौकातील पूर्वीची बांधकामे काढून टाकूण चांगले सुशोभिकरण करावे. चौक सुधारणा व रूंदीकरण कामीची तरतुद वाढवावी. भवानीनगर परिसरातील ओपन स्पेस विकसीत करणे कामी रूपये २० लाखाची तरतुद करावी.

**इंजि. श्री. बल्लाळ** :- महानगरपालिकेचे परवानगी व्यतिरिक्त अनधिकृत मोबाईल टॉवर उभारणारावर दंड आकारणी दुप्पट करणेस तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४अे ते १२४एल व त्या खालील तरतुदीच्या अनुषंगाने म.न.पा. हद्दीमध्ये विकास परवानगी देतांना आकारण्यात येणा-या विकास भाराचे कमाल दर लागु करणेस मंजूरी मिळणेकरिता व मंजूर रेखांकनातील अंतर्गत सुधारणा करतांना रेखांकन धारकाकडून अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण व ड्रेनेज लाईनची कामे करून घेणेस मंजूरी मिळणेकामी प्रस्ताव सादर केलेले आहेत त्यास मंजूरी मिळावी.

**मा.सभापती साहेब :-** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे मंजूरी देणेस शिफारस करण्यांत यावी.

**शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :-** महानगरपालिका हद्दीत विविध टेलीफोन कंपन्यामार्फत टाकण्यांत येणा-या OFC केबल डक्ट करणे करितांचे चार्जेस मा. शासन निर्णयानुसार १ कि.मीटर २ वाहिन्या प्रणाली साठी रूपये १५ लक्ष याप्रमाणे परिगणित केलेले आहेत. त्यानुसार १वाहिनी १ कि.मी. साठी रू.७.५० लक्ष खर्च येत आहे. एका डक्ट मध्ये १+३ वाहिन्या टाकावयाचे झाल्यास प्रथम येणा-या कंपनीस सदर रक्कमे मध्ये १५ % सुट देणे व १+३ वाहिन्या टाकण्यांस सांगणे व नंतर येणा-या कंपनीस खोदणी चार्जेस + वाहिन्याचे १५% जादा रक्कम घेण्यास मंजूरी मिळणे करिता प्रस्ताव सादर केलेला आहे त्यास मंजूरी मिळावी.

**मा.सभापती साहेब :-** प्रशासनाने सादर केले प्रमाणे प्रस्तावास मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. बारस्कर पो.ज.** :-महापौर शहरविकास निधी सन२०१०-२०११करिता रूपये ४ कोटी ठेवलेला होता.सन २०११-२०१२करिता निधीची तरतुद केलेली नाही. तो निधी वाढवून ठेवण्यांत यावा.

**मा.श्री. पवार बा.रे. :-** तसेच उपमहापौर शहर विकास निधी ,स्थायी समिती सभापती शहर विकास निधी व महिला बाल कल्याण सभापती शहर विकास निधी प्रत्येकी रूपये २५ लाख याप्रमाणे ठेवण्यांत यावा.

**मा.सौ. ढोणे मा.सु. :-** वॉर्ड विकास निधी ठेवावा.

**मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** वॉर्ड विकास निधी सन २०१०-२०११ करिता रूपये ४ कोटी २० लाख ठेवला होता सन २०११-२०१२ करिता निधी ठेवलेला नाही तो वाढवून भरीव तरतुद करावी.

**मा.सभापती साहेब :-** महापौर शहर विकास निधी रूपये ५ कोटी , उपमहापौर शहर विकास निधी रूपये २५ लाख , स्थायी समिती सभापती शहर विकास निधी रूपये २५ लाख आणि महिला व बाल कल्याण समिती सभापती शहर विकास निधी रूपये २५ लाख तसेच वॉर्ड विकास निधी प्रत्येक वॉर्डसाठी रूपये ११ लाख या प्रमाणे तरतुद करणेस शिफारस करण्यांत यावी.

**मा.श्री. पवार बा.रे.** व **मा.श्री. बारस्कर पो.ज. :-** शहरात नविन पाईप लाईन टाकणे व वाढीव हद्दीत पाईप लाईन टाकणे कामी प्रत्येकी रूपये २० लाखाची तरतुद केलेली आहे. नगरसेवक त्यांचे निधीतुन व वॉर्ड विकास निधीतुन कामे करतील तेव्हा ही तरतुद कमी करावी.

**मा.सभापती साहेब :-** शहरात नविन पाईप लाईन टाकणे व वाढीव हद्दीत पाईप लाईन टाकणे या लेखाशिर्षावरील तरतुद कमी करून ती प्रत्येकी रूपये १० लाख याप्रमाणे करण्यांस शिफारस करण्यांत यावी. सिध्दार्थनगर, लालटाकी, मिसगर चाळ, गवळीवाडा, न्यु आर्टस्, ॲन्ड कॉमर्स कॉलेज, रस्ता, वारूळाचा मारूती, दातरंगे मळा परिसर शिवाजीनगर कल्याण रोड नालेगांव, बागडपट्टी, सर्जेपुरा, तेलीखुंट, बालिकाश्रम रोड, विद्याविहार कॉलनी,गृहशिल्प, हडको कॉलनी, बागरोजा, दिल्लीगेट, तोफखाना या परिसरातील पाणी पुराठयासाठी जिल्हा परिषद कर्मचारी वसाहत येथे पंपगृह उभारणे व पाईप लाईन टाकणेकामी स्वतंत्र लेखाशिर्षा निर्माण करून त्यामध्ये रूपये २० लाखाची तरतुद करण्यांस तसेच मा. सदस्यांनी सुचविलेली कामे अंदाजपत्रकातील त्यांना मंजूर करण्यांत आलेल्या स्वेच्छा निधी व वॉर्ड विकास निधीमधून करणेत यावीत. मा.महिला व बाल कल्याण समिती व मा. स्थायी समिती सभेकरिता चहापान आणणे कामी रूपये ३ हजार ऐवजी रूपये ४ हजार ५०० चे खर्चास मंजूरी देणेस शिफारस करण्यांत यावी. मा.आयुक्त साहेब यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सभेमध्ये चर्चा करून निर्णय घेतलेले असुन त्याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये दुरूस्त्या शिफारशीसह सन २०१०-२०११ सालचे सुधारित सन २०११-२०१२ सालचे बाबवार अंदाजपत्रक मनपाचे स्कुल बोर्डाचे शेअर्ससह महानगरपालिका सभे पुढे सर्वानुमते सादर करण्यांत यावे.

--**--

**<u>ठराव :-</u>** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.आयुक्त साहेब यांनी तयार केलेले व स्थायी समितीकडे सादर झालेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१०-२०११ सालचे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे मुळ अंदाजपत्रक (म.न.पा. स्कुल बोर्डासह) व त्या सोबतचे दरवाढ करणेबाबत सादर केलेले प्रस्ताव सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१०-२०११ सालचे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे म.न.पा. स्कुल बोर्डासहचे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल साधक बाधक चर्चा करणेत येवुन ही सभा पुढिल प्रमाणे शिफारस दुरूस्त्या करत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१०-२०११ सालचे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा कमी जास्त करणेस नविन लेखाशिर्ष तयार करून त्यावर तरतुद करणेस मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत येत आहे.

मा.आयुक्त साहेब यांनी मनोगता मध्ये व्यक्त केलेली कामे व सुचविलेल्या योजना राबविणे कामी उपाययोजना करणेस शिफारस करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणे हद्दवाढीतील भागामध्ये पोहोच रस्ते विकसीत करणे करिता प्रस्तावीत रस्त्याचे कामासाठीचे रूपये ३ कोटीचे अंदाजपत्रकास मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे. तसेच अंदाजपत्रका सोबतचे दरवाढ करणेबाबत सादर केलेले.

**प्रस्ताव क्र.१** :- वसुली विभाग- महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतील व्यापारी संकुलातील गाळयांचे हस्तांतरण करणेकामी आकारणी शुल्क आकारणे.

**प्रस्ताव क्र.२** :- वसुली विभाग- महानगरपालिकेत मालमत्ता नाव नोंदणी शुल्क १ टक्का आकारणेबाबत.

**प्रस्ताव क्र.३** :- सार्वजनिक बांधकाम विभाग- महानगरपालिकेच्या मालकीचे मंगल कार्यालये, सभागृह इ. चे भाडेत वाढ करणे व रस्ता फोडणे शुल्कात वाढ करणे.

**प्रस्ताव क्र.४** :- नगररचना विभाग- मोबाईल टॉवर दंड आकारणी दुप्पट करणेबाबत.

**प्रस्ताव क्र.५**:-कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह-अहमदनगर जिल्हयातील वेगवेगळया नर्सिंग इन्स्टिटयूटमधील प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थीनीकडून शुल्क आकारण्याबाबत.

**प्रस्ताव क्र.६** :- कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह- अहमदनगर महानगरपालिकेचे दवाखाने, रूग्णालये व फिरता दवाखाना येथील दरवाढीबाबत.

**प्रस्ताव क्र.७** :- नगररचना विभाग- विकास भाराचे कमाल दर लागू करणेबाबत.

**प्रस्ताव क्र.८** :- नगररचना विभाग-मंजूर रेखांकन धारकाकडून अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण व ड्रेनेज लाईनचे कामे करून घेणेबाबत.

**प्रस्ताव क्र.९** :- सार्वजनिक बांधकाम विभाग-मनपा हद्दीत विविध टेलीफोन कंपन्यामार्फत टाकण्यात येणा-या OFC केबल डक्ट बाबत.

या प्रस्तावास पुढिलप्रमाणे मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक १ :-** महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतील व्यापारी संकुलातील गाळयांचे हस्तांतरण करणे कामी रूपये १ लाख प्रती गाळा या प्रमाणे आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक २:-** महानगरपालिका अभिलेखामध्ये मिळकत धारकाचे नांवाची नोंद करण्यासाठी इमारत व जमिनीचे किंमतीवर १ टक्का याप्रमाणे दर आकारणी करणेस मंजूरी देण्यांस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ३:-** अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या मंगल कार्यालये व सभागृहाच्या दैनंदिन भाडे व रस्ता फोडणेचे चार्जेस मध्ये खालील प्रमाणे दर निश्चित करून आकारणी करणेस शिफारस करण्यांत येत आहे.

| **अ.क्र.** | **कार्यालयाचे नांव** | **सध्याचे प्रचलित दर** | | **प्रस्तावित दर** | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | **भाडे** | **डिपॉझीट** | **भाडे** | **डिपॉझीट** |
| १ | डॉ. महाले मंगल कार्यालय | १४८९/- | १३५०/- | ३०००/- | १३५०/- |
| २ | शिवपवन मंगल कार्यालय | ३३०९/- | १०००/- | ४५००/- | १०००/- |
| ३ | भाग्योदय मंगल कार्यालय | ६६१८/- | -- | ७५००/- | ५००/- |
| ३ | सावेडी क्रीडा संकुल सांस्कृतिक कार्यक्रम | भाडे रू. १०००/-<br>सेवाकर रू.१००/-<br>शिक्षण कर रू. २/-<br>उपकर रू.१/-<br>एकुण रू.११०३/- | | २०००/-<br>सेवाकर,<br>शिक्षणकर<br>व<br>उपकरासह | |
| ४ | व्यावसायिक कार्यक्रम | भाडे रू.५०००/-<br>सेवाकर रू.५००/-<br>शिक्षणकर रू.१०/-<br>उपकर रू.५/-<br>एकुण रू.५५१५/- | | १००००/-<br>सेवाकर,<br>शिक्षणकर<br>व<br>उपकरासह | |
| ५ | आंबेडकर स्मारक | ५५३/- | -- | १०००/ | ५००/- |
| ६ | महावीर कलादालन | ५५२/- | -- | १५००/- | ५००/- |
| ७ | जुने महानगरपालिका सभागृह | १२१३/- | -- | २०००/- | ५००/- |

तसेच डांबरी रस्ता फोडणेचे दर रूपये १५००/- आकारण्यांस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ४ :-** महानगरपालिका हद्दीमध्ये परवानगी व्यतिरिक्त अनधिकृत उभारलेल्या मोबाईल टॉवरवर दंड आकारणी बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे दुप्पट दंड आकारणी करणेस मंजूरी देण्यांस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ५ :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे अहमदनगर जिल्हयातील व नगर शहरातील नर्सिंग इन्स्टिटयूट चे कार्यानुभवासाठी व प्रशिक्षणासाठी येणा-या विद्यार्थी व विद्यार्थीनी कडून प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे शुल्क आकारणी करण्यांस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ६:-** अहमदनगर महानगरपालिकेचे दवाखाने रूग्णालये व फिरता दवाखाना येथील दरवाढी बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे दर आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ७ :-** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ अे ते १२४ एल व त्या खालील तरतुदीच्या अनुषंगाने महानगरपालिका हद्दीमध्ये विकास परवानगी देतांना आकारण्यांत येणा-या विकास भाराचे कमाल दर लागु करणेबाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे कमाल दर आकारणी करण्यांस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ८:-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मंजूर रेखांकनातील अंतर्गत सुधारणा करतांना रेखांकन धारका कडून अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण व ड्रेनेज लाईनची कामे करून घेणे बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे मंजूरी देण्यांस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ९:-**अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये विविध टेलीफोन कंपन्यामार्फत टाकण्यांत येणा-या OFC केबल डक्ट बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

तसेच

* महिला व बाल कल्याण कार्यक्रम या लेखाशिर्षातून रूपये १ कोटी ५० लाखाची रक्कम ही कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याच्या नवीन इमारतीचे बांधकाम करण्यासाठी खर्च करावी. व या इमारतीमध्ये अद्ययावत सुतिका गृह व नवीन बालरूग्ण विभाग करण्यात यावीत.

* महानगरपालिका हद्दीत लागणारे अनधिकृत जाहिरात बोर्डवर कार्यवाही करून त्यावर आकारणी करण्यांत यावी.

* रस्ता बाजू फी वसुली ठेका देणेकामी रस्ता बाजू फी रूपये २५ लाख निश्चित करून जाहिर निविदा मागविण्यांस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

* बेकायदेशीर नळ कनेक्शन संबंधी कडक कार्यवाही करावी पाणीपट्टीची तसेच घरपट्टी थकबाकीची वसुली वाढवावी.

* महानगरपालिकेने १ व्हेटनरी डॉक्टर व २ सहाय्यक कर्मचारी नेमून त्यांचेकडून फिरत्या उनाड कुत्र्याचे निर्बीजीकरण करणेत यावे. तसेच रोगट कुत्र्यांवर उपचार करावेत.

* मा. महिला व बाल कल्याण समिती व मा.स्थायी समिती सभे करिता चहापान आणणे कमी रूपये ३,०००/- ऐवजी रूपये ४५००/- चे खर्चास मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

* मा.सदस्यांनी सुचविलेली कामे अंदाजपत्रकातील त्यांना मंजूर करण्यांत आलेल्या स्वेच्छा निधी व वॉर्ड विकास निधीतुन करण्यांत यावीत.

* खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक करणे कामी झोन वाईज निविदा मागविण्यांत याव्यात.

* अहमदनगर महानगरपालिकेचे औरंगाबाद रोड वरील नविन प्रशासकीय इमारती मधील सभागृह मा.जिल्हाधिकारी साहेब यांचेकडील कार्यक्रम व अहमदनगर महानगरपालिकेचे कार्यक्रमा व्यतिरिक्त इतर कुणालाही कुठल्याही कार्यक्रमासाठी देण्यांत येउ नये.

* गोविंदपुरा, यशवंत कॉलनी , विराज कॉलनी, यशवंतनगर, (शहा कॉलनी) शितल कॉलनी, पठाण कॉलनी, गोकुळनगरी, इक्रा परिसर, रहेमिनया कॉलनी, मोठी मरियम मस्जिद परिसर याठिकाणी १५०वॅट सोडीयम व्हेपर बसविणेबाबत. अंदाजपत्रकीय रक्कम रू.१०,००,०००/- चे खर्चास १५० वॅट सोडीयम व्हेपर पोल टाकणे / उर्जा बचत दिवे बसविणे या लेखाशिर्षातून खर्च करणेस मंजूरी देणेत येत आहे.

* गांधी मैदान पसिरातील आतील भागाचे सिमेंट कॉक्रीटीकरण, सुभोभिकरण, इलेक्ट्रीक व्यवस्था करणेबाबत अंदाजपत्रकीय रक्कम रू. २०,००,०००/- चे खर्चास चौक सुधारणा व रूंदीकरण या लेखाशिर्षातून खर्च करणेस मंजूरी देणेत येत आहे.

* जिल्हा परिषद कर्मचारी वसाहत येथे पंपगृह उभारणे व पाईप लाईन टाकणेकामी अंदाजपत्रकीय रक्कम रू. १०,००,०००/- चे खर्चास पाणी पुरवठा योजनेसाठी नविन सुधारणा कामे करणे या लेखाशिर्षातून खर्च करणेस मंजूरी देणेत येत आहे.

अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०१०-२०११ सालचे सुधारित **व** सन २०११-२०१२ सालचे बाबवार अंदाजपत्रक महानगरपालिकेच्या स्कुल बोर्डासह शेअर्ससह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.
सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
**(श्री. संजय बाबुराव गाडे पा.)**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**अहमदनगर महानगरपालिका**

**सोबत** :- * सन २०१०-२०११ सालचे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता
* महानगरपालिकेचे हद्दवाढीतील गावाकरिताचे पोहोच रस्ते विकसीत करणेची प्रस्तावीत कामे व खर्च तरतुदीचा तक्ता

| अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मा. स्थायी सभेने शिफारस केलेला सन २०१०-२०११ चा अर्थसंकल्प | | | | | |
| | | | | | |
| सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१०).......................................५९५९०९३१ | | | | | |
| एकुण जमा....................................................................२११०४४४१०० | | | | | |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा..............................................२१७००३५०३१ | | | | | |
| एकुण खर्च..................................................................... २११०३४९२०० | | | | | |
| अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०११)....................................५९६८५८३१ | | | | | |
| | | | | | |
| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने मंजूर केलेली तरतुद |
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मनपा दवाखान्यांसाठी औषधे व उपकरणे खरेदी | १३०००००० | १२०००००० | | २५०००००० |
| २ | महापौर चषक स्पर्धा | १००००००० | | ४०००००० | ६०००००० |
| ३ | सांस्कृतिक कार्यक्रम घेणे | २००००००० | १००००००० | | ३००००००० |
| ४ | सहावे वेतन आयोग फरक | २०००००००० | | ८०००००० | १९२०००००० |
| ५ | वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती | २००००००० | | ४२५०००० | १५७५०००० |
| ६ | वसुली परतावा (मालमत्ता कर, पाणीपट्टी इ.) | १५०००००० | | ५०००००० | १००००००० |
| ७ | मनपा इमारत व रोखपाल विमा | १७५०००० | २५००० | | २०००००० |
| ८ | हत्यारे व अवजारे खरेदी | ४०००००० | | १०००००० | ३०००००० |
| | | | | | |
| | एकूण | **२८३७५०००** | **२२२५०००** | **२२२५०००** | **२८३७५०००** |
| | | | | | |

स्वाक्षरी /-
(श्री. संजय गाडे),
सभापती,
स्थायी समिती ,
अहमदनगर महानगरपालिका ,अ.नगर

| अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मा. स्थायी सभेने शिफारस केलेला सन २०११-२०१२ चा अर्थसंकल्प | | | | | |
| | | | | | |
| सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०११).........................................५९६८५८३१ | | | | | |
| एकुण जमा........................................................................२०८४५८९१०० | | | | | |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा................................................२१४४२७४९३१ | | | | | |
| एकुण खर्च....................................................................... २०८७२२९००० | | | | | |
| अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१२).....................................५७०४५९३१ | | | | | |
| | | | | | |
| अ.नं. | लेखाशिर्ष (जमा बाजू) | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सर्वसाधारण कर | ४५००००००० | ७००००००० | | ५२००००००० |
| २ | मार्केट व स्लॉटर फी (रस्ता बाजू फी) | ११००००० | १४००००० | | २५००००० |
| ३ | नळधारकाकडून पाणीपट्टी जमा | १४००००००० | १२८३०००० | | १५२८३०००० |
| ४ | जकात कर | ५८३११०००० | ३००००००० | | ६१३११०००० |
| ५ | मालमत्ता नाव नोंदणी फी | ३३००००० | ६५००००० | | ९८००००० |
| ६ | बाधा, वापरा, हस्तांतरीत करा/एफबीटी प्रकल्प प्रिमियम | १००००० | २०००००००० | | २०१००००० |
| | | | | | |
| | एकूण | **११७७६१००००** | **१४०७३००००** | ० | **१३१८३४००००** |

| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | साप्रवि आकस्मिक खर्च | ९००००० | १००००० | | १०००००० |
| २ | उल्लेखनीय कार्यबद्दल गौरव | २०००० | २०००० | | ४०००० |
| ३ | उनाड कुत्री बंदोबस्त व दंशावर उपचार | २०००००० | | १०००००० | १०००००० |
| ४ | विद्युत साहित्य खरेदी | ३५००००० | ५००००० | | ४०००००० |
| ५ | नविन इले. पोल व स्पॅन फिटींग़ | १०००००० | १०००००० | | २०००००० |
| ६ | हातगाड्या, ढकलगाड्या, सायलरिक्षा खरेदी | २००००० | | १९०००० | १०००० |
| ७ | रक्तपेढी वैद्यकीय अधिकारी व तंत्रज्ञ कंत्राटी नेमणूक | ० | १०००००० | | १०००००० |
| ८ | नविन शववाहिनी खरेदी | ० | ५००००० | | ५००००० |
| ९ | रस्ते कॉक्रीटीकरण | २५००००० | | २४००००० | १००००० |
| १० | पूल बांधणे | २०००००० | | १५००००० | ५००००० |
| ११ | महापौर चषक स्पर्धा | २०००००० | | १०००००० | १०००००० |
| १२ | सिना नदी पात्रातील अतिक्रमणे हटविणे | १२००००० | ३००००० | | १५००००० |
| १३ | गणवेश खरेदी (शिक्षण मंडळ) | ५००००० | | ३५०००० | १५०००० |
| १४ | बेंच व फनिचर खरेदी व दुरुस्ती | ५०००० | ३००००० | | ३५०००० |
| १५ | ए. व्ही. रुम | १००० | १५०००० | | १५१००० |
| १६ | क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम (शिक्षण मंडळ) | १००००० | १००००० | | २००००० |
| १७ | गटर दुरुस्ती | ३०००००० | | **१००००००** | २०००००० |
| १८ | टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे | ५०००००० | | **२५०००००** | २५००००० |
| १९ | रस्ते डांबरीकरण व नुतणीकरण | ५०००००० | १०००००० | | ६०००००० |
| २० | नविन इमारती | २०००००० | | १८००००० | २००००० |
| २१ | अधिकारी यांचे निवास बांधणे व सोयीसुविधा | २०००००० | | १०००००० | १०००००० |
| २२ | चौक सुधारणा व रुंदीकरण | १०००००० | २५००००० | | ३५००००० |
| २३ | स्मशानभूमी सुधारणा व नविन स्मशानभूमी | १०००००० | १०००००० | | २०००००० |

| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| २४ | महापौर शहर विकास निधी | ० | ५०००००००० | | ५०००००००० |
| २५ | उपमहापौर शहर विकास निधी | ० | २५०००००० | | २५०००००० |
| २६ | स्थायी समिती सभापती शहर विकास निधी | ० | २५०००००० | | २५०००००० |
| २७ | महिला व बाल कल्याण समिती सभापती विकास निधी | ० | २५०००००० | | २५०००००० |
| २८ | वॉर्ड विकास निधी | ० | ७७०००००० | | ७७०००००० |
| २९ | शहरात नविन पाईप लाईन टाकणे | २०००००० | | १०००००० | १०००००० |
| ३० | वाढीव हद्दीत नविन पाईप लाईन टाकणे | २०००००० | | १०००००० | १०००००० |
| ३१ | १५० वॅट सोडीयम व्हेपर पोल टाकणे | ५००००० | १०००००० | | १५००००० |
| ३२ | नविन संगणक खरेदी/ ई गव्हर्नन्स | २००००० | १५००००० | | १७००००० |
| ३३ | मनपा हद्दवाढीत समाविष्ट भागात पोहोच रस्ते करने ( सोबत यादीप्रमाणे ) | २०००००००० | १०००००००० | | ३०००००००० |
| | एकूण | ५९६७१००० | १५५४७०००० | १४७४०००० | २००४०१००० |

स्वाक्षरी /-
(श्री. संजय गाडे),
सभापती,
स्थायी समिती ,
अहमदनगर महानगरपालिका ,अ.नगर

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

### सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात आवश्यक पोहोच रस्ते विकसीत करणेकरीता प्रस्तावीत कामांची यादी

| अ..क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | विराज कॉलनी अंतर्गत रस्ते ते नगर-मनमाड हायवे पर्यत पोहोच रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत | रू.२५,००,०००/- |
| २ | इक्रा स्कुल परिसरातील रस्ते नगर-औरंगाबाद रोड हायवे पर्यत पोहोच रस्ता डांबरीकरण करणेबाबत | रू.२०,००,०००/- |
| ३ | बुरूडगांव रोड वरील पुणे हायवे ते चाहुराणा बुद्रुक ते आदर्श पार्क, पुणे हायवे ते विनायकनगर व बुरूडगाव रोड बालाजी कॉलनी सर्व जोड रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत | रू.४०,००,०००/- |
| ४ | वडगाव रोड ते अर्थव रो. हौसिंग सोसायटी ते यश रो. हौसिंग सोसायटी ते जय मंगल नगरी पर्यत रस्ता डांबरीकरण व मजबुतीकरण करणेबाबत. | रू. २०,००,०००/- |
| ५ | मनमाड हायवे ते नागापूर गावठाणा पर्यत रस्ता डांबरीकरण व मजबुतीकरण करून मिळले बाबत. | रू. २०,००,०००/- |
| ६ | कवडेनगर पारिजात कॉलनी नगर-मनमाड रोडला जोडणारा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत. | रू. २०,००,०००/- |
| ७ | महावीर नगर ते भिंगारदिवे चाळ नगर-मनमाड रोड जोडणारा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत | रू.२०,००,०००/- |
| ८ | जुना पिंपळगाव रस्ता ते भिस्तबाग शिव रस्ता व तपोवन रस्ता व संचारनगर माउलीनगर अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डंबरीकरण करणेबाबत. | रू.२०,००,०००/- |
| ९ | नामदेव चौक ते नित्यसेवा ते भगवानबाबा चौक ते तपोवन रोड पर्यतचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत | रू.२५,००,०००/- |
| १० | सारसनगर मधील व्ही.डी.ओकॉन ते वाकोडी रोड पर्यत रस्त्याचे मजबुतीकरण करणेबाबत. | रू.२०,००,०००/- |
| ११ | सोलापूर रोड शांतीनगर ते नामगंगा पर्यत रस्त्याचे मजबुतीकरण करणेबाबत | रू. १५,००,०००/- |
| १२ | सावेडी राजनगर ते एकविरा चौक पर्यत रस्त्याचे मजबुतीकरण करणेबाबत. | रू. २५,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| १३ | सावेडी येथील स.नं. ८७ मधील अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत. | रू.७,००,०००/- |
| १४ | भिस्तबाग येथील स.नं. २३,११,१२ मधील अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत. | रू. ७,००,०००/- |
| १५ | पवननगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत | रू.७,००,०००/- |
| १६ | वारूळाचा मारूती रस्ता व दातरंगे मळा परिसर रस्ते मजबुतीकरण करणेबाबत | रू. ९,००,०००/- |
| | **एकुण** | **रू. ३,००,००,०००/-** |

**स्वाक्षरी /-**
**(श्री. संजय बाबुराव गाडे पा.)**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**अहमदनगर महानगरपालिका**